कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.
दि.०१/३/२०१९ ते दि.३०/०९/२०१९

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन आदेश क्रमांकः कौविउ-२०१९/प्र.क्र.२७/प्रशा-२

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ मार्च, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय,रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक इएसई-१०९९ /प्र.क्र.११९ /प्रशा-२, दिनांक ०८ सप्टेंबर, २००६.
२) शासन आदेश क्रमांकः कौविउ-२०१८/प्र.क्र.४८/प्रशा-२, दिनांक २६जून, २०१८.
३) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक-पदनि -२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क,दिनांक ७ सप्टेंबर २०१८
४) शासन आदेश क्रमांकः कौविउ-२०१८/प्र.क्र.४८/प्रशा-२, दिनांक २८ सप्टेंबर, २०१८.
५) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक-पदनि -२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क,दिनांक २१ फेब्रुवारी २०१९

शासन निर्णय :-

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील एकूण १२७३ पदांपैकी एकूण ९४५ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास उपरोक्त अनुक्रमांक १ येथील दिनांक ०८ सप्टेंबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र. ३ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७ सप्टेंबर २०१८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनाच्या अनुक्रमांक ४ येथील दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील १८९ अस्थायी पदे दि.०१ ऑक्टोबर, २०१८ ते दि. २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता, संदर्भाधीन क्रमांक ५ येथील वित्त विभागाच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णय अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कौशल्य विकास व उद्योजकता यंत्रणेतील यासोबतच्या परिशिष्ट १ ते ४ मध्ये दर्शविण्यात आलेली एकूण १८९ अस्थायी पदे दिनांक ०१ मार्च, २०१९ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीत सुरू ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त पदे पुढे चालू ठेवण्यासाठी होणारा खर्च हा मागणी क्रमांक झेड ए-१ मधील खालील संबंधित लेखाशीर्षाखालील त्या त्या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा :-

१) २२३०, कामगार व सेवायोजन
०२, सेवायोजन
००१ संचालन व प्रशासन
(०१)(०१) सेवायोजन संचालनालय, मुंबई--(२२३० १०७ २)

२) २२३०, कामगार व सेवायोजन
०२, सेवायोजन
००४ संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी
(०१)(०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगार विषयक सेवा--(२२३० ११० ७)

३) २२३०, कामगार व सेवायोजन
०२, सेवायोजन
१०१, सेवायोजन सेवा
(०१)(०१) सेवायोजन कार्यालये--(२२३० ११६ १)

४) २२३०, कामगार व सेवायोजन
०२, सेवायोजन
१०१ सेवायोजन सेवा
(०२)(०१) अपंग व्यक्तींकरिता विशेष सेवायोजन कार्यालय, मुंबई--(२२३० ११८ १)

३. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३१३१४३६२५२००३ असा आहे.हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sangeeta Ajit Shinde

Digitally signed by Sangeeta Ajit Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba607066e7a34e428b7c7c73de0f7e09a315a2af5075fd47f1e08389aa137b81, cn=Sangeeta Ajit Shinde
Date: 2019.03.13 14:38:43 +05'30'

(संगीता अ. शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र १- २, मुंबई/नागपूर,
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३. आयुक्त,कौशल्य विकास,रोजगार, व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवीमुंबई,
४. उप संचालक, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता, सर्व विभागीय मुख्यालय (संचालनालयामार्फत)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत),सर्व कार्यालय प्रमुख (संचालनालयामार्फत),
६. कक्ष अधिकारी (रोस्वरो-२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
७. निवड नस्ती.